क्रमांक : ८८

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ / आषाढ २७, १९४४ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

८८. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२ रोजी सुरु होऊन शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण १९४ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ३८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण १५६ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ६६ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली असून ९० प्रलंबित निवेदनांपैकी २२ निवेदने गुरुवार, दिनांक १२ मे, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. प्रलंबित ६८ निवेदनांपैकी १४ निवेदने गुरुवार, दिनांक २ जून, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. तसेच, प्रलंबित ५४ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १२ निवेदने गुरुवार, दिनांक ३० जून, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता एकूण प्रलंबित ४२ निवेदनांपैकी १० निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १८ जुलै, २०२२**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

लक्षवेधी सूचना क्र.४५

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.सुरेश भोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली येथील कोपर, मोठा गाव, जुनी डोंबिवली, गणेशनगर, देवीचा पाडा, भिवंडी जवळील पिंपळास, माणकोली, दिवे आदी भागात गेले दोन वर्षापासून ते अद्यापपर्यंत वाळू माफियांकडून मोठ्या प्रमाणात रेती उपसा करुन व त्याची तस्करी करुन महसूल यंत्रणांशी हातमिळवणी करुन कोट्यावधी रुपयांचा आर्थिक घोटाळा करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, मुंब्रा पूर्व जलद रेल्वे मार्गाजवळील खारफूटीचे जंगल असलेल्या आणि खाडीचे पाणी असलेल्या भागात दररोज मुंब्रा खाडीतील झाडीत आडोशाला १५ ते २० बोटी उभ्या केल्या जात असणे, दिवसा वाळू उपसा करताना पोलीस व महसूल विभागाचे अधिकारी यांची गस्त असल्याने दिवसा वाळू उपसा न करता रात्रीच्या वेळी वाळू उपसा करुन पार्क केलेल्या बोटीद्वारे रेतीची तस्करी करण्यात येणे, पर्यावरण प्रेमी व सामाजिक संघटनांचा महसूल खात्यावर दबाव असल्यानेच दिवसा झाडीत उभ्या केलेल्या बोटी रात्री आणून रेतीची तस्करी करण्यात येणे, डॉ.अश्विनी जोशी, डॉ.महेंद्र कल्याणकर जिल्हाधिकारी असताना कल्याण, डोंबिवली, भिवंडी, मुंब्रा खाडीतील बेकायदा उपसा करणाऱ्या रेती माफियांविरुध्द सक्तीने कारवाई करुन माफियांचे बोटी व अन्य साहित्यांचे सुमारे दोन कोटी रुपयांचे नुकसान करण्यात येणे, यामुळे शासनाचा रेती माफियांवर जरब असणे, परंतु गेले दोन तीन वर्षात जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष नसल्यामुळे सदरहू भागात शासनाच्या महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबरच रेती माफियांनी आर्थिक संगनमत करुन शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बडवून पर्यावरणाची प्रचंड हानी करण्यात येणे, उपसा केलेली रेती शहराच्या विविध भागात पोहचविण्यात येणे, काही साठा खाडी किनारी हौदात, तर काही रेतीचा साठा खारफुटीच्या आडोशाला ठेवण्यात येणे, खारफुटी झाडांची प्रचंड कत्तल करण्यात येऊन खाडी क्षेत्रात राडारोडा टाकून खाडीचे लचके तोडण्यात येणे, महसूल अधिकाऱ्यांना वाळू उपशाची माहिती दिली की ते फक्त कारवाई केली जाईल असे साचेबध्द उत्तर देतात असेही पर्यावरणप्रेमींनी सांगणे, ठाणे येथील अनेक दैनिकांमध्येही यासंदर्भात आवाज उठविण्यात येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य जाणीवपूर्वक दुर्लक्ष, परिणामी पर्यावरण प्रेमी व येथील स्थानिक जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, या सर्व प्रकाराला जबाबदार असलेल्या त्या त्या भागातील तहसिलदार व संबंधित महसूल अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करुन त्यांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**श्री.बाळासाहेब थोरात, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील डोंबिवली, कोपर, मोठागांव, जुनी डोंबिवली, गणेश नगर, देवीचा पाडा तसेच भिवंडी तालुक्यातील पिंपळास, माणकोली व ठाणे तालुक्यातील मुंब्रा परिसर या खाडीलगत अवैध रेती उत्खननाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. खाडीलगत असलेल्या कल्याण, भिवंडी, ठाणे या तालुक्यातील महसूल व पोलीस यंत्रणेमार्फत वेळोवेळी कारवाई केलेली आहे.

ठाणे तालुक्यातील मुंब्रा, भिवंडी तालुक्यातील माणकोली, पिंपळास व कल्याण तालुक्यातील जुना गांव, मोठी डोंबिवली या भागात खाडीकिनारी खारफुटीचे जंगल असून रेती उपसा करणारे सक्शन पंप व बार्ज हे खारफुटीच्या जंगलामुळे दिसून येत नाहीत. दक्षता पथकामार्फत तिनही तालुक्यांमध्ये खाडीलगत गस्त घालून असे सक्शन पंप व बार्ज आढळल्यास ते बोटी, हायड्रा यांच्या सहाय्याने किनाऱ्यावर खेचून ते नादुरूस्त करण्यात येतात. तसेच, गॅस कटरद्वारे कापून निकामी करण्यात येतात. तसेच खाडीकिनारी लगत रेती उपसा करणाऱ्या कुंड्यांवर कारवाई करून सदरच्या कुंड्या ह्या JCB च्या सहाय्याने नष्ट करण्यात येतात.

सक्शन पंप व बार्ज निकामी करणेकरीता बोट व इतर साहित्य आवश्यक असलेने तसेच कारवाई करतेवेळी खाडीपात्रामध्ये ओहोटीच्या काळात कारवाई करण्यास मर्यादा येतात. तक्रारी प्राप्त झाल्यानंतर बोट व इतर साहित्य संकलित करून केवळ भरतीच्या वेळी व दिवसाच खाडीपात्रामध्ये कारवाई करणे शक्य होते. त्यामुळे संबंधित तक्रारदारांना महसूल यंत्रणेमार्फत कारवाई करण्यात येईल असे कळविले जाते.

ठाणे, मुंब्रा, पारसिक खाडी, दिवा, चुहा ब्रिज, साबे या खाडीपात्रात जानेवारी,२०२० ते मार्च,२०२२ या कालावधीत १५ प्रकरणी कारवाई करुन २६ सक्शन पंप, ३० बार्ज, ७३ वाळू कुंड्या व १३४ ब्रास वाळूसाठा नष्ट करण्यात आला असून ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कल्याण-डोंबिवली परिसरातील खाडीपात्रामध्ये जानेवारी,२०२० ते मार्च,२०२२ या कालावधीत ५ प्रकरणी कारवाई करुन १० सक्शन पंप, २ बार्ज, १ क्रेन नष्ट करुन ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

भिवंडी, काल्हेर, कशेडी व कोण खाडीपात्रामध्ये जानेवारी,२०२० ते मार्च,२०२२ या कालावधीत १३ प्रकरणी कारवाई करुन २४ सक्शन पंप, १८ बार्ज व २०८५ ब्रास रेतीसाठा नष्ट करुन ८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच ५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रु.६.७९ लाख इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय दक्षता पथक तसेच ठाणे, कल्याण, भिवंडी तालुक्यातील तालुकास्तरीय पथकांमार्फत खाडीकिनारी व त्यालगतच्या क्षेत्रामध्ये गस्त घालून वाळूचे अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येते.

कोपर ते मुंब्रा दरम्यान रेल्वे पूलांजवळ होणाऱ्या अवैध रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली रेल्वे अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, क्षेत्रीय महसूल अधिकारी यांचे समवेत वेळोवेळी बैठका आयोजित करुन नियोजित उपाययोजनांचा आढावा घेण्यात येऊन त्यानुसार वाळू उत्खननास प्रतिबंध करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते.

ठाणे जिल्ह्यातील खाडीपात्रामध्ये जानेवारी २०२० पासून आजतागायत एकूण ४२ कारवाया करण्यात आल्या असून ६९ सक्शन पंप, ६० बार्ज, ७७ रेतीच्या कुंड्या, १० बोटी, १ क्रेन व २६७५ ब्रास वाळूसाठा नष्ट करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे माहे एप्रिल,२०२१ ते फेब्रुवारी,२०२२ अखेर गौण खनिजाच्या अवैध वाहतूकीच्या १८८ प्रकरणी दंडात्मक कारवाई करण्यात येवून रक्कम रु.३.२७ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच १८ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना.
## सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"चंद्रपूर जिल्यातील दुर्गम आदिवासी भागातील पहिल्यावहिल्या सिमेंट उदयोगांमध्ये अनेक अनियमितता व जमीन भूसंपादन भूपृष्ट अधिकार चुकीच्या पदधतीने केल्या गेल्यामुळे आदिवासी कोलाम कुटुंबाची फसवणूक व शासनाच्या जमिनीचा भोंगळ कारभारामुळे माणिकगड सिमेंट कंपनीने अवैध मार्गाने बेकायदेशीर वन विभाग महसूल व खाजगी आदिवासी कोलाम समाजाच्या जमिनी बनावट कागदपत्रे भूमापन मोजणी न करता चुकीच्या पध्दतीने ताबा प्रकिया करुन हस्तांतर करणे, मोठया प्रमाणात चुनखडी उत्खनन व वन पर्यावरण नियमाचे उल्लंघन करुन शासनाची कर चोरी करुन दिशाभूल करणे, अनधिकृत कब्जा नियमबाहय खदान परिसरात नवीन रस्त्यांची अनधिकृत बांधकाम करणे, नोकारी कुंसुंबी बॉंबेझरी क्षेत्रातील जमीन मान्यता नसताना ६४२ ट्रॅक्टर पेक्षा जास्त जमिनी क्षेत्राच्या बाहेर जाऊन कंपनीने उत्खनन व अनधिकृत बांधकाम आदिवासींच्या जमिनीवर कब्जा करणे, गेल्या वीस वर्षापासून कंपनीला दिनांक १७ ऑगस्ट,१९८१ रोजीच्या शासनाने दिलेल्या लिस्ट करारानुसार जमिनीचे भूमापन सीमांकन चिन्ह निश्चित न करता भूमी अभिलेख विभागाकडून भूमापन मोजणी न करणे, अवैध उत्खनन अनधिकृत बांधकाम केल्याच्या अनेक तक्रारी प्रशासनाकडे असताना हा घोळ निकाली काढण्यासाठी भूमापन मोजणी केल्याशिवाय पर्याय नसल्याचे अहवाल तहसिलदार जिवती व भूमी अभिलेख निरीक्षक यांनी पोलिसांसमक्ष कुसुंबी येथे स्थळ पंचनामा करुन जिल्हाधिकारी यांना देणे, खदाणीत उत्खनन आदिवासी कुटंबाची शेत जमिनीत शोध सुरु असल्याचा अहवाल १४ फेब्रुवारी २०१९ ला देणे, मात्र वनविभागानी पुढील कारवाई न करणे, तहसिलदार राजुरा यांनी नोकारी येथील तेरा आदिवासी जमीन खरेदी व्यवहार संशयास्पद तसेच शासनाची योग्य मार्गाने परवानगी न घेता सतत पाठपुरावा करुन १९५६ पासून येथील भूमापन मोजणी झाली नसणे, तसेच चाळीस वर्षापासून कंपनीने नकाशाची दुरुस्ती अथवा महसूल अभिलेखात दुरुस्ती न करता शासनाची दिशाभूल आदिम आदिवासाची फसवणूक करीत राष्ट्रीय संपत्तीची कर चोरी वन पर्यावरण आदिवासी हक्क संरक्षण कायदयाचे उल्लंघन करत कंपनी मोठया प्रमाणात आर्थिक फायदा मिळूवन शासनाला दिशाभूल करीत असून याकडे संबंधित प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्यशासनाने सखोल चौकशी करुन संबंधित कंपनीच्या जमिनीची संपूर्ण चौकशी करुन स्थानिक आदिवासींना लाभ देण्यासाठी संबंधित कंपनी प्रशासनावर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

### श्री.बाळासाहेब थोरात, मा.मंत्री, महसूल यांचे निवेदन.

मे. सेंचूरी टेक्सटाईल्स अँड इंडस्ट्रीज लि.(माणिकगड सिमेंट कंपनी) यांना मौजा कुसुंबी, नौकारी तह. राजूरा/कोरपना जि. चंद्रपूर येथील वनविभागाची कंपार्टमेंट मधील ६४३.६२ हे.आर या क्षेत्रावरील चूनखडक या प्रमुख खनिजा करीता शासन आदेश दिनांक ३०.०४.१९७९ अन्वये खनिपट्टा २० वर्षाकरीता (कालावधी दिनांक १७.०८.१९८१ ते १६.०८.२००१) मंजूर करण्यात आलेला होता. जिल्हा प्रशासना मार्फत खाणपट्टयाचे करारनामा निष्पादन दि. १७.०८.१९८१ रोजी करण्यात आलेले आहे. ४९३.०० हे.आर क्षेत्रापैकी वन क्षेत्र ४२९.३८ हे.आर आणि महसूली क्षेत्र ६३.६२ हे.आर असे एकुण ४९३.०० हे.आर क्षेत्राची लिज कंपनी कडे आहे. कंपनीने फेज १ मधील बाधित वन क्षेत्र २३८.९६ हे.आरचे नुतनीकरण प्रस्ताव योग्य मागदर्शनास केंद्र शासनास सादर केले असता, केंद्र शासनाने नुतनीकरण प्रस्तावास मान्यता प्रदान केलेली आहे. त्यामुळे वन जमिनीच्या संदर्भात कोणताही बेकायदेशीरपणा आढळून आलेला नाही.

उपविभागीय अधिकारी, राजूरा यांनी सदर जमीनीचे भुपृष्ठ अधिकार संपादीत करण्यासंबंधाने दिनांक ०८.०९.१९८४ ला जाहीर व वैयक्तीक स्वरूपात नोटीस बजावून, हरकत व आक्षेप मागविण्यात येऊन, गावकरी व

(रू. ५,०००/- प्रती एकर) शेतातील झाडासह, रहीवाशी व जमीनमालक हे नगदी स्वरूपात मोबदल्याची मागणी करीत होते जेणेकरुन पावसाळयापूर्वी पर्यायी व्यवस्था करता येईल. त्यानंतर सदर कंपनीने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या दिनांक १९.०३.१९८५ रोजीच्या मान्यतेनंतर मोबदल्याची रक्कम जमा केल्यानंतर ती संबंधीत रहिवाशी व जमीनमालक यांना वाटप करण्यात आलेली आहे.सदर जागेची शासकीय मोजणी भूमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी करून त्यांच्या जागेची हद्द कायम केल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या तरतूदी नूसारच भुपृष्ठाचा जमीनीचा ताबा माणिकगड सिमेंट कंपनीच्या ताब्यात दिलेला आहे.

कंपनीने खाणकाम सुरू करण्यासाठी केंद्र शासना कडून पर्यावरण व वन विभागाची अनुमती प्रदान केलेली आहे. व भारतीय खाण ब्यूरो यांनी खाणकाम आराखड्यास मंजूरी प्रदान केल्या नंतर पर्यावरण मंजूरी व खाणकाम आराखडा मध्ये नमूद उत्खननाच्या परिमाणा एवढे उत्खनन करीत असून चूनखडक खनिजाचे आगावू स्वामीत्वधन (Advance Royalty) शासना कडे जमा करण्यात येते. केंद्र शासनाकडुन वनक्षेत्र वळतीकरण करणे करीता अंतिम मान्यता प्रदान केलेली असल्याने वन पर्यावरण नियमांचे उल्लंघन झालेले नाही. केंद्र शासनाने मान्यता प्रदान केल्यानंतर वनक्षेत्राचे हस्तांतरणापुर्वी बाधीत वनक्षेत्राचे सिमांकन करण्यात आलेले आहे.

खदान परिसरात नवीन रस्त्याचे अनधिकृत बांधकाम केल्याचे तसेच खदान क्षेत्राबाहेर उत्खनन अशी बाब निदर्शनास आलेली नाही, अथवा तक्रार प्राप्त नाही. संपूर्ण खाणक्षेत्राचे सीमांकन दर्शवणारे नकाशे तयार केल्या नंतरच भारतीय खाण ब्यूरो यांचे कडून खाणकाम आराखड्यास/ खाणकाम योजनेस मजुरी प्रदान करण्यात येते. कंपनीने खाणक्षेत्राचा Differential Global Positioning System (DGPS) सर्व्हे आणि Geo-Referencing Vectorization of Cadastral map तयार केलेला असून सदर नकाशास संचालक,भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन,नागपूर यांचे द्वारे मान्यता प्रदान केलेली आहे. संचालक,भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय,नागपूर यांचे द्वारे प्रमुख खनिजाचे उत्खनन, वाहतूक व खाणक्षेत्रावर केंद्र शासनाच्या धोरणानूसार **ILMS** (Integrated Lease Management System) प्रणाली द्वारे निगराणी ठेवण्यात येत असून या बाबत वेळोवेळी पडताळणी करण्यात येते.

कंपनीने ताब्यात असलेल्या ४९३.०० हेक्टर आर लीज क्षेत्रापैकी ६३.६२ हेक्टर आर जमीनी या खाजगी शेतक-यांच्या होत्या. सदर जमिनी बेकायदेशीर पणे ताब्यात घेण्यात आल्याची तक्रार शेतक-यांनी केली. त्याअनुषंगाने उक्त जागेवर तपासणी केली असता आज रोजी जमीनीवर उत्खनन होवून भुपृष्ठावर बदल झालेला आहे. त्यांमुळे सदर जागेची मोजणी करून हद्दी निश्चित करणे उचित राहील असा अहवाल उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचेकडे सादर केलेला आहे. अवैध उत्खनन व अनाधिकृत बांधकाम केल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त नाहीत.

कुसुंबी ता. राजूरा जि. चंद्रपूर येथील गावक-यांच्या शेतीच्या व घराच्या जागेचा ताबा घेण्यापूर्वी त्यांच्याशी विचार विनीमय करून पुनर्वसन ऐवजी घराचा व शेतीचा मोबदला नगदी स्वरुपात वाटप केल्यानंतरच जागेच्या भुपृष्टाचा ताबा संबंधीत कंपनीस देण्यात आला. त्यावेळी मौजा कुसुंबी येथील रहिवाशांनी पुर्वसनाऐवजी नूकसान भरपाई मोबदला देण्यात यावा अशी मागणी केली असल्यामुळे सदर गावाचे पुनर्वसन करण्यात आले नाही आणि सर्व प्रक्रीया ही नियमानुसारच करण्यात आलेली आहे.

*****************

**विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना.**

**सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**श्री. देवराव होळी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"चंद्रपूर जिल्यातील कुसुंबी, ता.जिवती येथील आनंदराव मेश्राम व इतर २४ आदिवासींची ६३.६२ हे.आर जमीन मालकी हक्काने असणे, मात्र या जमिनीवर मानिकगड सिमेंट कंपनीने स्थानिक प्रशासनिक अधिका-यांना हाताशी घेऊन १९ मार्च, १९८५ पासून बेकायदेशीरपणे ताबा मिळविणे, कंपनीने कोणालाही विश्वासात न घेता, कोणताही मोबदला न देता, नियमबाहय व बेकायदेशीररित्या अधिका-यांच्या संगनमताने जमीन कब्यात घेणे, सदर बाब भूसंपादन उपजिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर दि. २४.९.२०१७ व ३.२.२०१८ रोजी त्यांनी या जमिनीचा मोबदला व न्याय या आदिवासींना मिळवून देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, राजुरा यांना पत्र देणे, त्यावरुन तहसिलदार जिवती यांना पत्र देण्यात येणे, त्यावरुन दि.१६.५.२०१८ रोजी तहसिलदार, जिवती यांनी खोटा व बनावट अहवाला तयार करणे, त्या अहवालावरुन मालक असणारे हे आदिवासी परिवार न्याय व हक्कापासून वंचित होणे, दि. १८.११.२०२१ रोजी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी त्याच खोटया व बनावट अहवालावरुन कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई यांना अहवाल सादर करणे, या खोटया अहवालावर आक्षेप घेत वरिष्ठांकडे आदिवासी परिवारांना न्याय देण्याची सातत्याने मागणी करण्यात येणे, दि.९.२.२०२२ रोजीच्या अति.उपजिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या मा.विभागीय आयुक्त यांना पाठविलेल्या पत्रान्वये फेरफार क्र. २४८, दि. ३.२.२०२१ हा रद्द करणे, तसेच त्रिस्तरीय समितीन्वये याबाबत तहसिलदार, तलाठी यांना खुलासा सादर करण्याचे निर्देश देणे, यावरुन लक्षात येते की मौजा कुसुंबी येथील २४ आदिवासी परिवारांच्या हक्काचे हनन झाल्याने त्यांना न्याय देण्याची व दोषींवर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री.बाळासाहेब थोरात, मा.मंत्री, महसूल यांचे निवेदन.**

खाण खनिज (विकसन व विनियमन) अधिनियम १९५७ मधील कलम १०(३) नुसार मानिकगड सिमेंट कंपनी (मे. सेंचूरी टेक्सटाईल्स अँड इंडस्ट्री लि) यांना मौजा कुसुंबी, नोकारी, तह. राजूरा/कोरपना जि. चंद्रपूर येथील ६४३.६२ हेक्टर या क्षेत्रावरील चूनखडक या प्रमुख खनिज करीता शासन आदेश दिनांक ३०.०४.१९७९ अन्वये खनिपट्टा २० वर्षाकरीता मंजूर करण्यात येऊन याबाबतचा करारनामा दिनांक १७.०८.१९८१ रोजी करण्यात आलेले असून (कालावधी दिनांक १७.०८.१९८१ ते १९.८.२००१) आता सदर खनिपट्टा दिनांक १६.०८.२०३१ पर्यंत कंपनीस मंजूर आहे.

खानपट्टा मंजूर क्षेत्रापैकी ६३.६२ हे.आर हे खाजगी क्षेत्र असल्याचे लक्षात आल्यानंतर जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे दिनांक १९.३.१९८५ चे आदेशान्वये त्यावेळी झालेल्या गावकरी व मानिकगड सिमेंट कंपनी यांच्यातील आपसी समझोत्यानुसार शेतजमीनीचा मोबदला रू. १२,५००/- प्रती हेक्टर शेतातील झाडासह ठरविण्यात आलेला होता. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर दिनांक २८.४.१९८५ रोजी मौजा कुसुंबी, नौकारी आणि वन विभागाचे खंड यामध्ये एकूण ६४३.६२ हे.आर क्षेत्रापैकी ६३.६२ हे.आर क्षेत्राचे कंपनीस भुपृष्ठ अधिकार देणे संबंधाने ताबा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणात तक्रारी प्राप्त झाल्याने चंद्रपूर जिल्हयातील कुसुंबी ता. जिवती येथील मानिकगड सिमेंट कंपनी चुनखडीकरीता भूसंपादन शेतजमीन प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करून आदिवासी कोलामांना जमीनीचा मोबदला व न्याय मिळवून देण्याबाबत तहसिलदार,जिवती यांना अहवाल सादर करण्याबाबत उपविभागीय अधिकारी,राजूरा यांनी दिनांक १७.०२.२०१८ रोजी पत्र दिले. त्या अनुषंगाने तत्कालीन तहसिलदार,जिवती यांनी दिनांक १६.०५.२०१८ ला उपलब्ध कागदपत्रावरून असा अहवाल सादर केला आहे की, ७/१२ अभिलेखात भोगवटदार हे आदिवासीच्याच नावे आहे. भुपृष्ट अधिकाराने संपादीत करण्यात आलेल्या शेतजमीनीवरील आदिवासी कोलाम भोगवटदाराचे पुनर्वसन झाले अथवा नाही तसेच भोगवटदांना नोकरी दिली अथवा नाही या बाबत अभिलेखाची तपासणी केले असता नोंद अभिलेखात दिसून येत नाही.

तदनंतर अल्ट्राटेक सिमेंट लिमीटेड यांनी दिनांक १७.०६.२०२० रोजी माणिकगड सिमेंट (ग्रुप ऑफ सेंचुरी

करण्याबाबत तहसिल कार्यालय,जिवती यांचेकडे राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद यांचा केस क्र. ४२३६/२०१९ नुसारचा आदेश जोडून अर्ज सादर केला. सदर अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन तहसिलदार,जिवती यांचे आदेश दिनांक २५.०१.२०२१ अन्वये मंडळ अधिकारी,जिवती तसेच तलाठी,नगराळा यांना माणिकगड सिमेंट(ग्रुप ऑफ सेंचूरी टेक्सटाईल इंडस्ट्रीयल लि.) या नावा ऐवजी अल्ट्राटेक सिमेंट लि.(माणिकगड सिमेंट वर्क) या नावाचा फेरफाराची नोंद घेवून त्याबाबतचा अहवाल तहसिल कार्यालय,जिवती यांना सादर करण्याबाबत आदेश दिले. सदर आदेशाचे अनुषंगाने तलाठी,नगराळा यांनी फेरफार क्र. २४८ दिनांक ०१.०२.२०२१ रोजी नोंद घेतली व त्यानुसार तहसिलदार, जिवती यांनी दिनांक ०३.०२.२०२१ रोजी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधीकरण मुंबई समोरील याचिका क्र. ४२३६/२०१८ अन्वये स्वत: फेरफार नोंद रूजू केली. सदर फेरफाराची नोंद इतर अधिकारात घेण्यात आलेली दिसून येते. परंतु भोगवटदार सदरी कोणताही बदल करण्यात आलेला नसून २४ आदीवासी शेतकऱ्यांची नावे कायम ठेवण्यात आलेली आहेत.

फेरफार क्रमांक २४८ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयास विविध तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. त्या तक्रारीचे निराकरण करण्याचे अनुषंगाने दिनांक २२ सप्टें.२०२१ रोजी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या आदेशानुसार अपर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपविभागीय अधिकारी,राजूरा व जिल्हा खनिकर्म अधिकारी,चंद्रपूर यांची त्रि-स्तरीय समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने या प्रकरणात घेण्यात आलेला फेरफार क्र. २४८ रद्द करण्याची तसेच फेरफार घेत असतांना म.ज.म.अधिनियम, १९६६ चे कलम १५०(२) नुसार करावयाच्या कार्यवाहीचे उल्लंघन झाल्याने तत्कालीन तहसिलदार,जिवती व तत्कालीन तलाठी,नगराळा यांचेकडून खुलासा मागविण्याच्या शिफारसी केल्या आहेत. हा अहवाल स्विकारून याबाबत जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांनी दिनांक १८.११.२०२१ चे पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला होता. सबब तहसिलदार,जिवती यांनी दिनांक १६.५.२०१८ अन्वये दिलेला अहवाल आणि दिनांक १८.११.२०२१ रोजी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी शासनास दिलेला अहवाल या दोन्ही बाबी वेगवेगळया आहेत.

त्याशिवाय, अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली त्रि-स्तरीय समितीने काढलेल्या निष्कर्षानुसार उपविभागीय अधिकारी,राजूरा यांनी सदर तीन संयुक्त प्रकरणी सुनावणी घेऊन दिनांक ३०.११.२०२१ रोजी तत्कालीन तहसिलदार,जिवती यांनी प्रमाणीत केलेला फेरफार क्र. २४८ दिनांक ०३.०२.२०२१ रद्द करण्याबाबत आदेशित केला आहे.

श्री. विनोद कवडूजी खोब्रागडे व इतर अर्जाचे अनुषंगाने, विभागीय आयुक्त, नागपूर यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडून अहवाल मागविला असता, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक ०९.२.२०२२ च्या पत्रान्वये, त्रि-स्तरीय समितीचा अहवाल शासनास सादर केल्याचे तसेच उपविभागीय अधिकारी,राजूरा यांनी सुनावणी पूर्ण करुन आदेश दिल्याबाबत दिनांक १५ डिसेंबर २०२१ अन्वये अहवाल सादर केला आहे.

श्री. आनंद मारू मेश्राम यांनी मा. उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ९१३/२०१५ अन्वये खाणपट्टा मंजूर करण्यात आलेला कालावधी दिनांक १६.८.२००१ ला संपल्यानंतर कंपनीने वर्ष २००२ मध्ये नूतणीकरण करताना संबंधितांना मोबदला दिला नसल्याने याचिका दाखल केली होती. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक २७.६.२०१६ रोजीच्या आदेशान्वये "याचिकाकर्ता आनंद मारू मेश्राम यांनी स्वेच्छेने ताबा दिलेला असून त्यांना नुकसान भरपाई मिळालेली आहे. अनेक दशकांपासून खाणकाम सुरु असल्याची वस्तूस्थिती लक्षात घेऊन सदर याचीका फेटाळली आहे". मा.उच्च न्यायालयाच्या दि. २७.०६.२०१६ च्या आदेशाविरूध्द श्री. आनंद मारू मेश्राम यांनी मा. सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे SLP-Civil Appeal No. ३५०६३/२०१६ दाखल केलेली आहे. सबब, कुसुंबी ता. राजूरा(सध्या तालुका जिवती) येथील गावक-यांच्या शेतीच्या व घरांच्या जागेचा ताबा घेण्यापूर्वी त्यांच्याशी विचार विनिमय करून पुनर्वसन ऐवजी घराचा व शेतीचा मोबदला नगदी स्वरूपात वाटप केल्यानंतरच जागेचे भुपृष्ठ अधिकार देण्याच्या अनुषंगाने ताबा संबंधीत कंपनीत देण्यात आला. त्यावेळी मौजा कुसुंबी येथील रहीवाशांनी पुनर्वसनाऐवजी नुकसान भरपाई मोबदला देण्यात यावा अशी मागणी केली असल्यामुळे सदर गावाचे पुनर्वसन करण्यात आले नाही आणि सर्व प्रक्रिया ही नियमानुसारच करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपर जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली त्रि-स्तरीय समितीने काढलेल्या निष्कर्षानुसार उपविभागीय अधिकारी,राजूरा यांनी सदर प्रकरणात सुनावणी घेऊन दिनांक ३०.११.२०२१ रोजी तीनही संयुक्त प्रकरणात आदेश पारीत केला असून तत्कालीन तहसिलदार,जिवती यांनी नोंदविलेला फेरफार क्र. २४८ दिनांक ०३.०२.२०२१ रद्द केला आहे. तसेच तत्कालीन तहसिलदार व तलाठी नगराळा यांचेकडून मागविण्यात आलेला खुलासा प्राप्त झाला असून प्रकरणात जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

## लक्षवेधी सूचना क्र.७५

श्री. देवेंद्र फडणवीस, श्री.जयकुमार रावल, श्री.सुधीर मुनगंटीवार, श्री.अभिमन्यु पवार, श्री.मदन येरावार, श्री.नामदेव ससाने, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७५ पुढीलप्रमाणे आहे :-

" विभागीय आयुक्त, कोकण विभाग या कार्यालयामार्फत सन २०२२ मध्ये कनिष्ठ सहाय्यक व ग्रामसेवकांच्या पदोन्नतीसाठी विभागीय परिक्षा घेण्यात येणे, या विभागीय परिक्षा जिल्हा परिषदेमधील कनिष्ठ सहाय्यक या पदावरून वरिष्ठ सहाय्यक या पदासाठी तसेच ग्राम सेवक या पदावरून ग्राम विकास अधिकारी या पदासाठी घेण्यात येणे, विभागीय परिक्षा घेण्याचा, प्रश्नपत्रिका काढण्याचा तसेच तपासण्याचा व निकाल लावण्याचा संपूर्ण अधिकार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना असणे, या विभागीय परिक्षेमध्ये अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले असून विभागीय आयुक्त, कोकण विभाग कार्यालयातील उपायुक्त (आस्थापना) त्यांचे सहकारी आणि त्यांचा खाजगी वाहक यांनी कोटयावधी रूपयांचा भ्रष्टाचार केला असणे, सदर पदाच्या विभागीय परिक्षा पास होण्याकरिता परिक्षार्थी कर्मचाऱ्यांकडून दोन लाखांपासून दहा लाखांपर्यंत पैसे घेतले असणे, त्याबदल्यात परीक्षा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना परीक्षेच्या दोन ते तीन दिवसांपूर्वीच परिक्षेत येणाऱ्या एकूण प्रश्नापैकी अर्धे प्रश्न देण्यात येणे तसेच पेपर सोडवताना पेपर पत्रिकांमध्ये खाली जागा सोडायला लावून नंतर परिक्षा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना बोलावून त्यांच्याकडून उत्तरे लिहून घेण्यात येणे, या विभागीय परिक्षांमध्ये सहा ते सात कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची शक्यता असणे, विभागीय परिक्षेतील भ्रष्टाचारासाठी खाजगी ड्रायव्हरच्या मोबाईलचा वापर करण्यात आला असणे, सदर प्रकरणी सायबर सेलमार्फत चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता असणे, सदर परिक्षा राज्यातील ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्याशी संबंधित असल्याने तिचे व्यापक स्वरूप पाहता चौकशी अहवाल येईपर्यंत सदर विभागीय परीक्षेच्या निकालाला स्थगिती देण्याचीही आवश्यकता, शासनाने यासंदर्भात करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. श्री. हसन मुश्रीफ, मंत्री ( ग्राम विकास ) यांचे निवेदन

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील तरतूदीनुसार जिल्हा सेवा (वर्ग ३) (लिपीकवर्गीय) श्रेणी-३ या संवर्गातून वरिष्ठ सहाय्यकाची २५ टक्के पदे मर्यादीत स्पर्धात्मक विभागीय परिक्षेच्या आधारे कनिष्ठ सहाय्यक, भांडारपाल सहाय्यक, भांडारपाल किंवा कम्प्युटर या कर्मचाऱ्यांमधून निवडीने भरण्याकरिता संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत परिक्षा घेतली जाते.

ग्राम विकास विभागाचा शासन निर्णय क्र.परीक्षा/१०८९/सीआर-६४७/९०१३, दि.१६/०७/१९९१ " महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील सुधारीत तरतूदींनुसार ग्राम विकास अधिकाऱ्यांची २५ टक्के पदे निवडीने भरण्यासाठी मर्यादीत स्पर्धात्मक विभागीय परिक्षा घेण्यात येते. सदर परिक्षेसाठी विभागीय आयुक्त , कोकण विभाग यांची प्रधान परिक्षा समन्वयक आणि सर्व विभागाचे उपायुक्त (आस्थापना) यांची विभागीय परिक्षा समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

वरिष्ठ सहाय्यकांच्या पदासाठी मर्यादीत स्पर्धात्मक विभागीय परिक्षा फक्त कोकण विभागाने (अन्य विभाग वगळून) दि.०९/०२/२०२२ रोजी पनवेल येथे आयोजित केली होती. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत कोकण विभागाकडील वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदाची दि.०९/०२/२०२२ रोजी घेण्यात आलेल्या परिक्षेचा निकाल दि.१४/०३/२०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर परिक्षेमध्ये कुठल्याही प्रकारचा गैरप्रकार झालेला नसून यासंदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे विभागीय आयुक्त ,कोकण विभाग यांनी स्पष्ट केले आहे. तसेच अमरावती विभागाने दिनांक ०५/०१/२०२२ रोजी घेतलेली वरिष्ठ सहाय्यकांच्या पदासाठी मर्यादीत स्पर्धात्मक विभागीय परिक्षा डी कोडींग करतेवेळी एका कर्मचाऱ्याची फक्त पुरवणी पत्रिकाच आढळून आल्यामुळे सदरची परिक्षा पूर्णत: रद्द केली आहे. पुणे, नाशिक, औरंगाबाद व नागपूर विभागामार्फत वरिष्ठ सहाय्यकांच्या पदासाठी मर्यादीत स्पर्धात्मक विभागीय परिक्षा घेण्यात आल्या नसल्याचे संबंधित विभागांनी कळविले आहे.

तसेच ग्राम विकास अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठीच्या परिक्षा दिनांक १३/०३/२०२२ रोजी संबंधित विभागीय आयुक्त यांचे स्तरावर संबंधित विभागीय आयुक्त यांनी विभागीय परिक्षेचे आयोजन केले होते. ग्राम विकास अधिकारी या पदाच्या परिक्षेच्या विभागनिहाय उत्तरपत्रिका संबंधित विभागांकडून सीलबंद स्वरूपात प्राप्त झालेल्या आहेत. सदर उत्तरपत्रिका आहे त्या प्राप्त स्थितीत कोकण विभागीय कार्यालयाच्या कपाटात सीलबंद करून ठेवण्यात आल्या आहेत. सदरच्या उत्तरपत्रिकांचे सील अद्याप उत्तरपत्रिका तपासण्याची कार्यवाही करण्यासाठी उघडण्यात आले नाही. याही परिक्षेमध्ये कोणताही गैरप्रकार झालेला नाही. प्रश्नपत्रिकेत एका ठिकाणी जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ ऐवजी जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम, १९८० असा टंकलेखन दोषाबाबतची एकमेव तक्रार वगळता अन्य कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

वरील दोन्ही विभागीय परिक्षांच्या प्रश्नपत्रिका प्राश्निकांकडून सीलबंद (गोपनीय लखोटयात) प्राप्त करून घेऊन शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड यांचेकडून छपाई (सीलबंद लखोटयात) करून घेण्यात आली आहे. त्यानुसार, विभागनिहाय संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड येथून परस्पर देण्यात आल्या आहेत.

वरील दोन्ही परिक्षांच्या दरम्यान कोणताही गैरप्रकार झाला नसल्याचे आणि त्यासंदर्भात कुठलीही तक्रार संबंधित कार्यालयास प्राप्त झाली नसल्याचे विभागीय आयुक्त ,कोकण विभाग यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे सदरच्या दोन्ही परिक्षांना स्थगिती देण्याची आवश्यकता नाही.

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. ज्ञानराज चौघुले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-**

"वसई-विरार महानगरपालिका हद्दीत शहरातील घनकचरा आणि सांडपाणी समस्या सोडविण्यासाठी महापालिकेला संपूर्णत: अपयश आल्याने राष्ट्रीय हरित लवादाने वसई-विरार महापालिकेला सव्वाशे कोटी रुपये दंड आकारल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच निदर्शनास येणे, प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी सदरहू शहरात सांडपाणी समस्या आणि घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी कृती आराखडा तयार करुन कोणतेही नियोजन केले नसल्याने शहरात प्रदूषणाचा स्तर प्रचंड वाढून येथील जनतेस संसर्गजन्य रोगाचा प्रादूर्भाव होऊन त्यांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, प्रदूषण समस्येमुळे राष्ट्रीय हरित लवादाने वसई-विरार महापालिकेला मे २०१९ पासून प्रतिदिन साडे दहा लाख रुपये दंड आकारण्याचा निर्णय घेणे, सदर निर्णयानुसार अद्यापपर्यंत दंडाची रक्कम सव्वाशे कोटींवर जाणे, केंद्र सरकारने १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत सन २०२०-२१ आणि सन २०२१-२२ या दोन वर्षात महापालिकेला उपलब्ध करुन दिलेल्या एकूण ६४ कोटींपैकी अद्यापपर्यंत केवळ दोन कोटी रुपये इतका कमी निधी खर्च केल्याचा उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, पालिकेला ६४ कोटींचा निधी मिळूनही उपाययोजना करण्यात अपयशी ठरणे, हा निधी नुसता तिजोरीत पडून आहे की आपल्या मर्जीतील ठेकेदारांची टक्केवारी घेवून बिले काढण्यासाठी वापरला गेला असा वसई-विरार येथील नागरिकांमध्ये निर्माण झालेला संशय, निधी मिळविण्यापूर्वी कामाचे नियोजन करणे आवश्यक असताना पालिकेकडे कसलेच नियोजन नसल्याचे उघड झालेले असणे, घनकचरा व्यवस्थापनाबाबत पालिका पूर्ण अपयशी ठरली असून त्यामूळे स्वच्छ भारत अभियानात पालिकेचा क्रमांकही घसरत असणे, ढिसाळ नियोजन आणि गलथान कारभारामुळे वसई-विरार महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढून पर्यावरणाचा प्रचंड ऱ्हास होणे, परिणामी शहरातील जनतेचे जीवनमान धोक्यात येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, या सर्व प्रकाराला जबाबदार असलेल्या घनकचरा विभागाचे उपायुक्त, सहाय्यक आयुक्त यांचेसह त्यासंबधित अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची व हरित लवादाने आकारलेला दंड सदर अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याची होत असलेली मागणी, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे, असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

वसई विरार शहर महानगरपालिका या "क" वर्ग महानगरपालिकेची स्थापना दिनांक ३ जुलै, २००९ रोजी शासन अधिसूचनेन्वये करण्यात आली आहे. तथापि, महानगरपालिकेच्या स्थापनेपूर्वी गाव मौजे गोखीवरे भोयदापाडा येथे सुमारे १९.३३ हेक्टर जागेवर तत्कालीन नगर परिषदांकरिता डंम्पिंग ग्राऊंड अस्तित्त्वात होते. उक्त डंम्पिंग ग्राऊंडवर महानगरपालिका हद्दीत निर्माण होणारा कचरा जमा केला जात असल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे. उक्त कचऱ्यावर सद्यस्थितीत विंड्रोज कंपोस्टींग पध्दतीने प्रकिया करण्यात येते

त्याचप्रमाणे महानगरपालिकेने कचऱ्यावर प्रक्रिया करणेकामी ३०० टन प्रतिदिन क्षमतेच्या ४ नग ट्रॉमिल मशीन बसविल्या असून जेसीबी, पॉकलेन, डोजर मशीन देखील कार्यान्वीत करण्यात आले आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाचा रु. १२९.५४ कोटीचा प्रकल्प अहवाल महानगरपालिकेमार्फत शासनास सादर करण्यात आला आहे.

दरम्यान वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार शहरातील सांडपाणी निराकरण न झाल्याने रु. ११३ कोटीचा दंड आकारण्यात आल्याचे कळवून सदर प्रकरणी जुन्या साचलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या सूचनांचे अमंलबजावणी न केल्यास दिनांक ०१.०४.२०२० ते माहे एप्रिल, २०२१ पर्यंत प्रती माह रु.१० दशलक्ष इतका दंड आकारण्यात येईल असे दिनांक २८.०१.२०२२ च्या पत्रान्वये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने वसई विरार शहर महानगरपालिकेस कळविले आहे. सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली येथे याचिका दाखल करण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीय हरीत लवाद येथील Original Application No 32/2021 (WZ) या प्रकरणात महापालिकेस दंड ठोठावला आहे, ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या पत्राविरुध्द महानगरपालिकेमार्फत मा. सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची कार्यवाही सुरु आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेस सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालावधीत Air Quality प्रकल्पासाठी एकुण रु. ३२ कोटी व पाणीपुरवठा व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी एकूण रु. ३२ कोटी असे एकूण रु. ६४ कोटी अनुदान प्राप्त झाले आहे. सदर अनुदानाअंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्मशानभूमीकरीता विविध कामांचा प्रस्ताव तसेच महानगरपालिका क्षेत्रात इलेक्ट्रीक/हॅब्रीड व्हेईकल, स्वीपिंग मशीन्स, फाऊंटन्स बसविणे, वायु प्रदुषणा संबंधित नियंत्रण यंत्रणा तयार करणे, विविध ठिकाणी हवेची गुणवत्ता सुधारण्याकरिता यंत्रणा तयार करणे इ. बाबींवर खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच पाणीपुरवठा व घनकचरा व्यवस्थापनासाठी प्राप्त रु. ३२ कोटी च्या अनुदानातून उसगाव शिरवली येथे जलवाहिनी अंथरणे व सुर्या टप्पा-१ अंतर्गत जलवाहिनी अंथरण्याचे कामे अंतर्भूत आहेत. सदर अनुदानातून महानगरपालिका क्षेत्रात उद्भवणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता होणाऱ्या उपाययोजनांवर खर्च होणार आहे. सदर विषयाच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

केंद्रशासनामार्फत देशपातळीवर राबविण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षणामध्ये सन २०२१ मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेस २९ स्वच्छ सर्वेक्षण रँकींग प्राप्त झाले आहे. महानगरपालिकेच्या सांडपाणी व्यवस्थापनेअंतर्गत विरार येथे केंद्रशासनाकडून प्राप्त सॅटेलाईट सिटी योजनेच्या निधीमधून ३० एम एल डी क्षमतेची योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. तसेच अमृत योजने अंतर्गत नालासोपारा पूर्व भागाकरीता भुयारी गटार योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करुन पुढील कार्यवाही करीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर केल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

****

## लक्षवेधी सूचना क्र. १४६

**श्री. देवेंद्र फडणवीस व इतर वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:**

"इतर मागास वर्ग समाजाच्या आरक्षण व आत्तापर्यंत शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलतींचा व इतर लाभांचा सर्वकष दृष्टीने अभ्यास करून परिणामकारक कार्यान्वयन होण्याच्या दृष्टीने तसेच अतिरिक्त सवलती, लाभ प्रस्तावित करण्याच्या दृष्टीने अभ्यास करून मंत्रिमंडळाला शिफारस करण्यासाठी मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६ ऑक्टोबर, २०२० रोजी एका मंत्रिमंडळ उपसमितीचे गठन करण्यात आलेले असणे, या समितीने सव्वा वर्षाच्या कालावधीमध्ये बैठका व अहवाल तयार करण्याच्या दृष्टीने कोणतीच प्रगती केलेली दिसून आलेली नसणे, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायप्रविष्ट असल्याने या समाजासाठी सवलतीच्या योजना राबवून दिलासा देण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन केलेली असणे, परंतु या समितीच्या रेंगाळलेल्या कामकाजावरून समितीला तसेच सरकारला इतर मागासवर्गीयांच्या कल्याणाबाबत कोणतीही संवेदना उरलेली नसल्याचे अधोरेखित होत असणे, पाच मंत्र्यांचा समावेश असलेल्या या समितीत तत्कालीन वने, भूकंप पुनर्वसन मंत्री यांनी राजीनामा दिल्यामुळे जी जागा रिक्त झाली आहे तीदेखील अद्याप भरण्यात आलेली नसणे, ओबीसींना दिल्या जाणाऱ्या सवलती व इतर लाभांचा अभ्यास करून अतिरिक्त लाभ देण्याच्या बाबतीत शिफारशी करण्यासाठी समितीचे कामकाज अधिक जलद गतीने करणेकामी उपसमितीस पूर्णतः अपयश आलेले असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा.मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांनी करावयाचे निवेदन –**

इतर मागास वर्ग समाजाच्या आरक्षण व आतापर्यंत शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलतींचा व इतर लाभांचा सर्वकष दृष्टीने अभ्यास करुन परिणामकारक कार्यान्वयन होण्याच्या दृष्टीने तसेच अतिरिक्त सवलती/लाभ प्रस्तावित करण्याच्या दृष्टीने अभ्यास करुन मंत्रिमंडळाला शिफारस करण्यासाठी मा. श्री छगन भुजबळ, मा. मंत्री अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि. १६/१०/२०२० च्या शासन निर्णयान्वये मंत्रिमंडळ उप समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर मंत्रिमंडळ उप समितीच्या दि. २०/१०/२०२०, दि. २८/१०/२०२०,

दि.०५/११/२०२० व दि. २४/११/२०२० रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर समितीच्या दि. २४/११/२०२० रोजीच्या बैठकीत अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

सदर अहवाल सादर झाल्यानंतर तत्कालीन मंत्रिमंडळ उप समितीचे सदस्य मा.श्री.संजय राठोड, मंत्री, वने भूकंप पुनर्वसन यांनी राजीनामा दिल्यामुळे सदर समितीवर नवीन सदस्याची नियुक्ती करण्याबाबत प्रश्न उद्भवला नाही. इतर मागास वर्ग समाजाचे आरक्षण व त्यांना द्यावयाच्या अतिरिक्त सवलती व लाभ याविषयी शिफारशी करण्यासाठी नेमलेल्या मंत्रीमंडळ उप समितीने एकूण २२ शिफारशी केलेल्या असून यातील शिफारशी प्रामुख्याने रिक्त पदे भरणे,पदोन्नती देणे, महामंडळाचे भागभांडवल वाढवणे, वसतिगृह सुरु करणे, घरकुल योजना सुरु करणे, परदेशी शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थी संख्या वाढवणे इत्यादी स्वरूपाच्या आहेत. सदर शिफारशी विविध विभागाशी संबधित असून त्या त्या विभागाशी सल्लामसलत करून उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

***

एच २२७-१अ.

# महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे पहीले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना

श्री. सुनिल शेळके, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील पवना धरणासाठी सन १९६४ ते १९७२ दरम्यान १९ गावांतील १२०३ खाते धारकांच्या सुमारे २३९४ हेक्टर जमिनीचे शासनाकडून भूसंपादन होणे, यामध्ये एकूण बाधीत शेतकऱ्यांपैकी केवळ ३४० शेतकऱ्यांचे मावळ व खेड तालुक्यात कागदोपत्री पुनर्वसन करण्यात येणे, यातील बहुतांश शेतकऱ्यांच्या नावांची सातबाऱ्यावर नोंद नसून त्यांच्याकडे सदर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा नसल्याचे निदर्शनास येणे, उर्वरित ८६३ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, या प्रकल्पग्रस्तांना खास बाब म्हणून सन २०१० साली जमिनीचे वाटप करण्याचा निर्णय सरकारने घेऊन तसे आदेश मावळ प्रांताधिकाऱ्यांना २०१२ मध्ये देऊनही अद्याप वाटपाचे काम पूर्ण न होणे, सन २०१३ साली तत्कालीन उप मुख्यमंत्री यांच्या बैठकीत पवना प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप करण्यासाठी पुन्हा जमीन मोजणी करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब होणे, सदर प्रकल्पात संपादित क्षेत्र व शिल्लक क्षेत्राचे जलसंपदा विभागामार्फत मोजणी होऊनही त्या अहवालाचे महसूल व भूमी अभिलेख विभागाकडून खातरजमा करणे बाकी असणे, सदर पुनर्वसनाच्याबाबतीत दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील बैठक आयोजित होऊन सदर बैठकीमध्ये पुनर्वसनाचा प्रश्न लवकर मार्गी लागणे कामी मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे संबंधित विभागास उचित निर्देश होऊनही अद्याप हा विषय प्रलंबित असल्याने बाधित खातेदार व जनतेमध्ये शासनाच्या विरोधात निर्माण झालेली नाराजीची भावना व यावर शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

पुणे जिल्हयातील पवना प्रकल्प १९६५ पुर्वीचा असून सदर प्रकल्पास महाराष्ट्र प्रकल्पाबधित व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम १९७६, १९८६ व १९९९ या पुनर्वसन अधिनियमातील तरतुदी लागु नाहीत. पवना प्रकल्प हा जलकुंभ असल्याने सदर प्रकल्पास लाभक्षेत्र नाही. प्रकल्पग्रस्तांना यापुर्वी मावळ व खेड तालुक्यात बहुतांश वन विभागाच्या जमिनी वाटप करण्यात आलेल्या आहेत. पवना प्रकल्पासाठी सुमारे २४७८ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आलेले आहे. या पैकी १७९७ हेक्टर क्षेत्र पवना जलशाच्या बुडीत क्षेत्रामध्ये आहे. पवना प्रकल्पामध्ये एकुण १२०३ प्रकल्पग्रस्त आहेत. त्यापैकी ३४० प्रकल्पग्रस्तांना सन १९७४ दरम्यान पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आलेले असून उर्वरीत ८६३ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप करावयाचे आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.०७/०७/२०१० अन्वये, पुणे जिल्हायातील पवना प्रकल्पबाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांस खास बाब म्हणुन जमिनीचे वाटप करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. परंतु सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.४६८८/२०१३ मध्ये दिनांक ०३/१०/२०१३ च्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये जमिन

[illegible] पर्यायी जमिन वाटपाची कार्यवाही करता आलेली नाही

तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सन २०१३ मध्ये झालेल्या बैठकीतील निर्देशाप्रमाणे पाटबंधारे विभागामार्फत पवना प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटपासाठी मोजणी केली होती. तसेच मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/०९/२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशास अनुसरुन दिनांक २८/११/२०२१ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयामध्ये संबंधित अधिकारी व सन्माननीय श्री. सुनिल शेळके, विधान सभा सदस्य यांचे समवेत क्षेत्रीयस्तरावरील भूमी अभिलेख विभाग, पाटबंधारे विभाग, व महसूल विभाग यांची एकत्रित बैठक होऊन, प्रकल्पग्रस्तांना जमिन वाटप करणेसाठी गावनिहाय सर्व विभागांनी एकत्रितरित्या पाहणी करुन उपलब्ध असणाऱ्या जमिनीची माहिती तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर बैठकीस प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी उपस्थित होते व त्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या यादीवर हरकती नोंदवल्या आहेत. सदर हरकतींच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांची यादी १९ गावांमध्ये प्रसिध्द करणेत आली. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिनांक ११/०१/२०२२ व दिनांक २८/०१/२०२२ रोजी बैठक घेऊन गावनिहाय वाटपास उपलब्ध जमिन व प्रकल्पग्रस्तांची यादी सादर करणेच्या सूचना तहसिलदार मावळ यांना देणेत आलेल्या आहेत.

तसेच जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयात संबंधित अधिकारी व सन्माननीय श्री. सुनिल शेळके, विधान सभा सदस्य यांचे समवेत पुन्हा दिनांक २८/०१/२०२२ रोजी बैठक होऊन त्यामध्ये गाव निहाय प्रकल्पग्रस्तांच्या यादीचे वाचन करण्याचे ठरले. त्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांची यादी वाचनानंतर सुमारे ३०० हरकती प्राप्त झाल्या आहेत. सदर हरकतीवर निर्णय घेण्यासाठी जिल्हा पुनर्वसन कार्यालयामार्फत अभिलेख पडताळणीचे काम सुरू आहे. महसूल विभागामार्फत पडताळणी करून केवळ वाटपास उपलब्ध असणारे क्षेत्र सुमारे ६०२ हेक्टर असल्याचे स्थानिक चौकशीत दिसून येत असून यापैकी १३८ हेक्टर वरती अतिक्रमण असल्याचे दिसून येत आहे.

महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक ०७/०७/२०१० अन्वये पवना प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटपासंदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पवना धरणग्रस्त कृती समिती यांच्यावतीने दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ४६८८/२०१३ मध्ये दिनांक ०३/१०/२०१३ च्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये जमिन वाटपास स्थगिती देण्यात आली आहे. सदर विषयासंदर्भात माझ्या अध्यक्षतेखाली दिनांक १५/०२/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत सदर स्थगिती उठविण्याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याचे निर्देश विभागास दिलेले आहेत. त्यानुसार सदर स्थगिती उठविण्याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

****************

श्री. राम सातपुते, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"माहिती अधिकारात मागितलेली माहिती विद्यापीठात उपलब्ध नसल्याचे लक्षात आल्यावर व त्याची खात्री पटल्यावर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण यांनी दि. १३/१२/२०१७ रोजी जा.क्र. MUHS / UG/E-६/५७३/२०१७ चे पत्र सेक्रेटरी इंडीयन नर्सिंग कौन्सिल नवी दिल्ली व त्याची प्रत The Controller Of Publication Government Of India Department Of Publication Civil Line New Delhi यांना पाठवने त्याचबरोबर आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अंतर्गत सुरु असलेल्या नर्सिंग कोलेजेस मध्ये बी. एस्सी, पी.बी.बी.एस्सी व एम. एस्सी नर्सिंग या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाच्या अंतर्गत सुरु असलेल्या नर्सिंग अभ्यासक्रमाच्या मान्यता बाबतचे Government Of India चे अधिकृत Gazette Of Notification नसल्याने राज्यातील पदवी व पदव्युत्तर नर्सिंग विद्यार्थ्यांचे प्रवेश व त्यांना मिळणारी विद्यापीठातील डिग्री हि बेकायदेशीर असून त्यांचे भविष्य अंधारमीय होण्याची शक्यता असणे त्याचबरोबर गेले तीन चार वर्ष हा विषय ऐरणीवर आला असता यामध्ये कोणीही लक्ष न घालने तसेच महाराष्ट्र परिचर्या परिषदेवर प्रशासक असल्याने या विषयाकडे दुर्लक्ष होणे तसेच महाराष्ट्र परिचर्या परिषदेचे निवडणुका झाल्या असून त्याची कार्यकारणी अस्तित्वात येणे आणि जर महाराष्ट्र परिचर्या परिषदेने ठरवल्यास या विद्यार्थ्यांचे झालेल्या नोंदणी रद्द होणे व नवीन विद्यापीठातून नर्सिंग अभ्यासक्रम पूर्ण झालेल्या विद्यार्थ्याची नोंदणी न होणे असे झाल्यास हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात येण्याची शक्यता असून सर्वात महत्वाचे म्हणजे मागासवर्गीय इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारी केंद्र व राज्य सरकारची शिष्यवृत्ती बंद होण्याची शक्यता असणे कारण शासनाची शिष्यवृत्ती हि फक्त शासनाच्या मान्यता प्राप्त इन्स्टिटयूशन मध्ये शिक्षण व डिग्री घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच मिळणे. विद्यापीठातील सर्व नर्सिंग अभ्यासक्रमे हे केंद्र सरकारचे गॅझेट ऑफ नोटीफिकेशन (Official Gazette) नसल्यामुळे शासनाच्या मान्यता प्राप्त इन्स्टिटयूशनच्या अंतर्गत न येणे जन माहिती अधिकारी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांनी दि. २७/११/२०१७ रोजी चुकीची माहिती देणे, याबाबत विद्यापिठामधील B.sc, P.B.B.sc, M.sc (Higher Qualification) नर्सिंग अभ्यासक्रमांस भारत सरकार यांचे मान्यता असलेले गॅझेट ऑफ नोटीफिकेशन (Official Gazette) विद्यापीठात उपलब्ध नसल्याने देता न येणे त्यानंतर दि. २२/१२/२०१७ ला अपिलेट अधिकारी तथा विद्यापीठाचे कुलसचिव यांच्याकडे माहिती अधिकार कायद्यांतर्गत अपील करणे, दि. १४/०२/२०१८ रोजी अपिलीय प्राधिकारी व तथा कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण यांचे अपील क्र. ३२६/२०१८ चे विवेचन व सुनावनीचे आदेश प्राप्त होणे त्याबरोबर भारत का राजपत्रक (Gazette Of India) या शीर्षक असलेल्या बनावट दस्तावेज महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नर्सिंग अभ्यासक्रमाचे केंद्र सरकारच्या मान्यतेचे गॅझेट ऑफ नोटीफिकेशन

असल्याचे भासवने व दि. १२/१२/२००३ रोजी माहिती अधिकारात दिले या गॅझेट ऑफ नोटीफिकेशन वरून असे दिसून येते की, हे गॅझेट ऑफ नोटीफिकेशन विद्यापीठाचे नसून बँकिंग परिचालन और विकास विभाग भारतीय रिजर्व बँक केंद्रीय कार्यालय यांचे असणे यामध्ये काही तरी गोडबंगाल असणे आणि विद्यापीठाला केंद्र शासनाच्या मान्यतेचे गॅझेट ऑफ नोटीफिकेशन INC च्या कायद्या प्रमाणे उपलब्ध नसल्याचे सिद्ध होणे याची सखोल चौकशी होणे गरजेचे असणे आणि संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करून बनावट दस्तावेज तयार करून खरे असल्याचे भासवणे याबबत गुन्हा दाखल करणे शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. मंत्री, (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

संपुर्ण देशामध्ये एकसमान अभ्यासक्रम असावेत याकरिता विविध केंद्रिय परिषदांनी विहित केल्यानुसार अभ्यासक्रम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाद्वारे स्विकृत करण्यात येतात व त्यानुसार सर्व संलग्नित महाविद्यालयामध्ये अभ्यासक्रम राबविण्यात येतात. विद्यापीठाच्या आरोग्य विज्ञान विषयक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना मान्यता देणे ही बाब संबंधित केंद्रिय परिषदेच्या अखत्यारित येते. त्यानुसार विद्यापीठाच्या सर्व परिचर्या विषयक अभ्यासक्रमांना (बेसिक बी. एस्सी (नर्सिंग), पी. बी. एस्सी (नर्सिंग) व एम. एस्सी (नर्सिंग)) भारतीय परिचर्या परिषद,नवी दिल्ली यांची मान्यता आहे.

माहीती अधिकार अधिनियम, २००५ नुसार माहीतीच्या अधिकारात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या परिचर्या अभ्यासक्रमांना केंद्र शासनाची मान्यता असलेले "The Gazette of Notification" The Gazette of India for recognition of बेसिक बी. एस्सी (नर्सिंग), पी. बी. एस्सी (नर्सिंग) व एम. एस्सी (नर्सिंग) याची मागणी एका अर्जदाराने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे केली होती. सदर राजपत्राची प्रत त्यावेळी विद्यापीठाकडे उपलब्ध नव्हती. सबब दि. १३.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये विद्यापिठाद्वारे भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांना सदर अभ्यासक्रमांना मान्यता असल्याची प्रत विद्यापीठास उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आली.

त्याअनुषंगाने भारतीय परिचर्या परिषद यांनी दि. ०६.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये दि. २७.१२.२००३ चे "भारत का राजपत्र ( The Gazette of India) याची प्रत विद्यापीठास उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार विद्यापीठाद्वारे राबविण्यात येणारे बेसीक बी.एस्सी. (नर्सिंग), पी.बी.बी.एस्सी. (नर्सिंग) व एम.एस्सी. (नर्सिंग) पदव्यांना मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुषंगाने विद्यापीठाद्वारे सर्व पात्र विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदवी प्रदान करण्यात येत आहे. महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांचेद्वारे सर्व पात्र विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात येते. परिणामी विद्यापीठाद्वारे प्रदान करण्यात येणारे बेसीक बी.एस्सी. (नर्सिंग), पी.बी.बी.एस्सी. (नर्सिंग) व एम.एस्सी. (नर्सिंग) पदव्यांच्या मान्यतेबाबत कोणतीही बाधा येत नाही.

तसेच महाराष्ट्र परिचर्या परिषदेवर दि. १९.१२.२०१८ च्या आदेशान्वये तत्कालीन सहसंचालक, डॉ. तात्याराव लहाने यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती व त्यांच्या सेवा निवृत्तीनंतर दि.२७.०७.३०२१ च्या आदेशान्वये संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांची निवडणूक प्रक्रिया दिनांक ०६.०९.२०२१ रोजी सुरु करण्यात आली असून याबाबतची मतमोजणी दिनांक ०९.१२.२०२१ रोजी पूर्ण करण्यात आली आहे. यानुसार महाराष्ट्र परिचर्या अधिनियम १९६६ मधील कलम ४ च्या पोटकलम १ खालील तरतूदीनुसार महाराष्ट्र परिचर्या परिषद गठीत करण्याबाबतची अधिसूचना दि.२८.०६.२०२२ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व राज्यातील मान्यताप्राप्त विद्यापीठ यांचेशी संलग्नित मान्यताप्राप्त संस्थांमधे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना विहीत कागदपत्रे व बाबींची पूर्तता केल्यानंतर महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडून नोंदणी देण्यात येते.

**********************

लक्षवेधी सूचना ७५७

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

सर्वश्री. दिपक चव्हाण, अनिल पाटील, राजू कारेमोरे, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, नितीन पवार, दिलीपराव बनकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री. सुनिल भुसारा, दौलत दरोडा, अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, ॲड. अशोक पवार, सुनिल शेळके, अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, डॉ. किरण लहामटे, आशुतोष काळे, निलेश लंके, संग्राम जगताप, रोहित पवार, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, बबनराव शिंदे, यशवंत माने, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, मानसिंग नाईक, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. सुनिल प्रभू, चंद्रकांत (दादा) पाटील, मंगेश चव्हाण, सुधीर मुनगंटीवार, डॉ. पंकज भोयर, सचिन कल्याणशेट्टी, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" राज्यातील १९ वैद्यकीय महाविद्यालयातील २२२० अस्थायी सहायक प्राध्यापक गेली अनेक वर्षे रुग्णालयात कार्यरत असणे, कोरोना काळातही त्यानी दिलेली अखंड सेवा देणे, त्यामुळे या प्राध्यापकांची शासन नियम अंतर्गत सेवा नियमित करण्याचे आश्वासन मा.वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी कोरोनाच्या पहिल्या लाटेच्या काळात देण्यात येणे, परंतु दोन वर्षे झाले तरी त्याबाबत कार्यवाही न झाल्यामुळे दि.०५ जानेवारीपासून या प्राध्यापकांनी साखळी उपोषण सुरु करुन आजतागायत वेळोवेळी आंदोलने व त्यानंतर केलेले आत्मक्लेश आंदोलन करणे, तथापि, सदर आंदोलनादरम्यान एकीकडे रुणसेवा विस्कळीत होणे तर दुसरीकडे प्राध्यापकांनी पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे अध्यापन देखील बंद करण्यात येणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे हजेरीसह अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर होत असलेला परिणाम, गेल्या दीड महिन्यापासून आंदोलन सुरु असतांना शासनाने मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येणे, सदर अस्थायी डॉक्टरांनी कोरोना काळात केलेली सेवा व शासनाने त्यांना शासकीय सेवेत नियमित करण्याचे दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासंदर्भात करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या आस्थापनेवर प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक हे डॉक्टरांचे अध्यापकीय संवर्ग कार्यरत आहेत. या संवर्गापैकी सहायक प्राध्यापक, गट-ब हा कनिष्टतम संवर्ग असून या पदाची मंजूर पदसंख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे आवश्यकतेनुसार सहायक

प्राध्यापक, गट-ब पदावर नियमित नियुक्ती होईपर्यंत तात्पुरत्या नियुक्त्या करण्यासाठी त्या-त्या महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय निवड मंडळास अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सद्यस्थितीत सहायक प्राध्यापक, गट-ब संवर्गातील मंजूर पदसंख्या १७६५ इतकी असून सुमारे ७५० अध्यापक या पदावर तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत आहेत.

देशात व राज्यात माहे फेब्रुवारी/ मार्च, २०२० पासून कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव वाढू लागला. या आजाराच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत दिवसेंदिवस वाढणाऱ्या रुग्णसंख्येने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरचा ताण वाढविला होता. या आजाराच्या अनुषंगाने चाचण्या व औषधोपचार यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित रुग्णालयांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. यात तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत सहायक प्राध्यापकांनी देखील योगदान दिले आहे व त्यामुळे त्यांच्या सेवा नियमित करण्यात याव्यात ही संबंधित संघटनेची मागणी आहे. सदर मागणीची दखल घेवून वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सर्व संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. त्यानुसार या प्रकरणास असलेले वैधानिक कांगोरे विचारात घेता मा.सर्वोच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेवून तसेच प्रस्तावित सेवानियमितीकरणामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अगोदरच चालू करण्यात आलेली भरती प्रक्रिया बाधित होण्याची शक्यता व त्यातून निर्माण होणारी संभाव्य न्यायालयीन प्रकरणे विचारात घेवून या प्रकरणी निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यानुसार प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत सहायक प्राध्यापकांच्या सेवा नियमित करण्यात याव्यात यासह अन्य कांही मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटनेने माहे जानेवारी/ फेब्रुवारी मध्ये लाक्षणिक संप, साखळी उपोषण, असहकार इत्यादी मार्गांचा अवलंब करुन शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. या कालावधीत वरिष्ठ निवासी डॉक्टरांकडून रुग्णांच्या उपचारार्थ कनिष्ठ निवासी डॉक्टरांना मार्गदर्शन करुन रुग्णसेवेचे कामकाज हाताळण्यात येत होते व त्यायोगे रुग्णसेवा बाधित होणार नाही याची दक्षता घेण्यात येत होती. पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे चर्चासत्र व कार्यशाळा, विविध शोधप्रबंधाचे सादरीकरण इत्यादी उपक्रमात वरिष्ठ निवासी डॉक्टरांचा सहभाग होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने शोधप्रबंध सादर करण्यास वेळोवेळी मुदतवाढ देऊन विलंब शुल्क देखील क्षमापित केले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याचे आढळून येत नाही.

संबंधित संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी मा.मंत्री (वै.शि.) व सचिव (वै.शि.) यांच्या उपस्थितीत दि.१५/०३/२०२२ रोजी चर्चा करण्यात आली. या चर्चेनंतर शासनाच्या आवाहनास प्रतिसाद देऊन संबंधित संघटनेने दि.१८/०३/२०२२ पासून आपले आंदोलन स्थगित केले आहे. त्यानुसार सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज सुरळीत चालू आहे.

******************

## सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
## लक्षवेधी सूचना

सर्वश्री अबू आजमी,रईस शेख, शांताराम मोरे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"ठाणे शहरात बनावट कागदपत्राच्या आधारे मोठया प्रमाणावर अवैध औषध विक्री दुकाने ( केमिस्ट ) सुरू असल्याची गंभीर बाब दिनांक १ मार्च,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, विशेषत: वागळे इस्टेट या दाट लोकवस्ती असलेल्या विभागात अवैध औषध विक्री दुकाने राजरोसपणे सूरू असणे, स्वामी समर्थ मेडीकल अँड जनरल स्टोअर्स तसेच इतर संबंधित दुकानदारांनी दुकाने उघडण्यासाठी खोटे दस्तावेज शासनास सादर करून संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून मिळविलेले परवाने, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार शासनाकडे पत्रव्यवहार करून अवैध औषध विक्री दुकानांवर कारवाई करण्याची करण्यात आलेली मागणी, परंतु अद्यापपर्यंत कोणत्याही अवैध दुकानांवर कारवाई न होणे, परिणामी स्थानिक नागरिकांच्या जिवितास निर्माण झालेला धोका, या गंभीर विषयाबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रीया "

**********************************************************************************************************

## मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

ओषधांचे उत्पादन व विक्री हे औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५ अंतर्गत नियंत्रित केले जाते. औषध विक्री परवाना मंजूर करण्यापूर्वी ज्या बाबीचे अनुपालन करणे अनिवार्य आहे, त्याबाबत सदर नियमांतील नियम- ६४ मध्ये तरतूदी नमूद केलेल्या आहेत. औषध विक्री परवाना घेवू इच्छिणाऱ्या अर्जदारांने विहीत नमून्यांत आवश्यक शुल्कासह व आवश्यक कागदपत्रांसह परवाना प्राधिकारी यांचेकडे अर्ज करणे अनिवार्य आहे. अन्न व औषध प्रशासनामध्ये सहायक आयुक्त (औषधे) हे औषध विक्री परवाने मंजूर करण्यासाठी परवाना प्राधिकारी आहेत. अर्जदाराने पूरेशी जागा,त्यांचा ताबा (Possession), औषध साठवणूकीसाठी व्यवस्था,तज्ञ मनुष्यबळ पुरविल्यानंतर त्याबाबतची पडताळणी करून व त्या संबधित आवश्यक कागदपत्रे पडताळून परवाने मंजूर केले जातात.

ठाणे शहरातील श्री मनोज सावंत यांनी दि. १६.११.२०२१ रोजी तसेच मा. लोकप्रतिनिधी यांनी दि. ११.०२.२०२२ रोजी वागळे इस्टेट परिसरातील स्वामी समर्थ मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स विरुध्द तक्रार केली असून त्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ नुसार सदर परवाना देण्यासाठी आवश्यक असणारे निकष पूर्ण करीत असल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर आस्थापनेविरुध्द प्रशासकीय कारवाई घेण्यात आलेली नाही. तथापि, सोसायटीच्या ना-हरकत प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबत संभ्रम असल्यामुळे सदर बाब पोलीसांकडे वर्ग करण्यात आली आहे.

ठाणे येथील वागळे इस्टेट परिसरात एकूण १८८ किरकोळ औषध विक्रेते परवानाधारक आहेत. या परवानाधारकांच्या जागेच्या कागदपत्रांबाबत अथवा बनावट कागदपत्रांबाबत वर नमूद तक्रारी वगळता मागील ३ वर्षात कोणत्याही तक्रारी प्राप्त नाहीत. तसेच वर नमूद ०२ तक्रारी वगळता स्थानिक लोकप्रतिनीधी, सामाजिक कार्यकर्ते, यांचेकडूनही तक्रारी प्राप्त नाहीत. त्याचप्रमाणे, दि.०१.०३.२०२२ रोजी वा त्यासुमारास ठाणे शहरात, विशेषत: वागळे इस्टेट परिसरात कोणतेही अवैध औषध विक्री दुकान/दुकाने अन्न व औषध प्रशासनाच्या निर्दशनास आलेले नाहीत.